जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

7 JUN 2006

प्रति,

प्रशासन अधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड.

विषय : सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी).

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(११४/०६)/प्राशि-३, दिनांक १६ मे, २००६

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं. ६२०/२, वाघोली, हवेली, पुणे | वाघोली | इंग्रजी | १ ली |

कायम विनाअनुदानीत

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं. ६२०/२, वाघोली, हवेली, पुणे

JSPMS PRODIGY PUBLIC SCHOOL WAGHOLI CBSE AFFILIATION NO. 1130193

PRINCIPAL
Prodigy Public School

C:\Documents and Settings\omsai1\Cookies\My Documents\AJ\NPS050.doc

(3)

<u>कायम विना अनुदान</u>

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य-८/नेवा/३५२८/१०
पुणे दिनांक ३१/५/२०१०

प्रति,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,
जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, ताथवडे पुणे-३३ संचलित
प्रॉडीजी पब्लिक स्कूल,
वाघोली ता.हवेली जि.पुणे.

**<u>विषय</u> -** कायम विनाअनुदानित तत्वावरील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीने वर्ग / अतिरिक्त तुकड्या मंजूरीबाबत (इंग्रजी माध्यम)

**<u>संदर्भ</u> -** शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.नाहप-२००९/ (६६३/०९) माशि-१ दि.७ ऑगस्ट २००९.

संदर्भाकिंत शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकड्या / वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | वर्ग / तुकडी | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|
| इयत्ता २ री | नैसर्गिक वाढ | जुन २००६ |
| इयत्ता ३ री | प्रथम वर्ग | ---,,--- |
| इयत्ता ४ थी | प्रथम वर्ग | ---,,--- |
| इयत्ता ५ वी | प्रथम वर्ग , नैसर्गिक वाढ | जुन २००७ |
| इयत्ता ६ वी | प्रथम वर्ग , नैसर्गिक वाढ | जुन २००८ |
| इयत्ता ७ वी | प्रथम वर्ग , नैसर्गिक वाढ | जुन २००९ |

<u>अटी व शर्ती</u> -

१. शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

२. शाळेत स्वच्छतागृहांची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

३. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करण्यास दिलेले ना हरकत प्रमाणपत्र कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय काढून घेण्याचा अधिकार राज्य शासनास राहील. तसेच राज्य शासनाने दिलेल्या निर्देशांची सीबीएसई/आयसीएसई/आयबी अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांनी पूर्तता न केल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र कोणतेही कारण दिल्याशिवाय काढून घेण्याचे अधिकारदेखील राज्य शासनास राहतील.

४. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील विद्यार्थ्यांचे प्रवेश बोनाफाईड जन्मपत्राच्या दाखल्यावर करण्यात यावेत.

५. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांतर्फे राज्य शासनातर्फे शुल्क निर्धारण समितीने केलेले शुल्क आकारले जावे.

६. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील वर्गांमध्ये विद्यार्थीक्षमता / विहित नियमांप्रमाणेच राहील.

७. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी इ.१ ते ५ वीपर्यंत राज्य मंडळाचा इंग्रजी माध्यमाकरिता असलेला अभ्यासक्रम इ.१ ते ५ वीपर्यंत राबविला जात नाही त्या शाळांनी राज्य मंडळाचा अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०१०-२०११) राबविणे अनिवार्य राहील.

MRS. MADHUBALA AMIT BARELIKAR
PRINCIPAL
PRODIGY PUBLIC SCHOOL

JSPM'S PRODIGY PUBLIC SCHOOL WAGHOLI
CBSE AFFILIATION NO. 1130193

PRINCIPAL
Prodigy Public School

वीपर्यंत त्रिभाषा सूत्र पाळले जावे. मराठी भाषा ही व्दितीय भाषा म्हणून शिकविली जावी.

९. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांचे व्यवस्थापन ज्यावेळी विविध पदांमध्ये उमेदवारांची निवुक्ती करतेवेळी उपस्थित राहण्याकरीता जिल्हा शिक्षणाधिकारी अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्याला व्यवस्थापनाने आमंत्रित करणे आवश्यक राहील.

१० सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनातर्फे कोणत्याही प्रकारच्या देणग्या विदयार्थी अथवा पालकांकडुन घेण्यात येणार नाहीत.

११. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनातर्फे प्रॉव्हीडंट फंडची योजना कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात यावी.

१२. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील विदयार्थी काही कारणास्तव शाळा सोडुन अन्य शाळेत प्रवेश घेवू इच्छित असेल तर अशा कोणत्याही विदयार्थ्यांवर त्याच शाळेमध्ये शिक्षण घेण्याबाबतची सक्ती केली जावू नये.

१३. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील सुरु असलेले वर्ग व विदयार्थी संख्येची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये दि.३१ ऑगस्टपूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

१४. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील प्रत्येक वर्गवाढीस संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१५. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी ट्रफीक सेफ्टी गाईड लाईन्सची (पोलीस, अग्निशम व वाहतुक विभाग यांनी निर्धारीत केल्यानुसार) काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१६. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी फायर प्रोटेक्शन ॲरेंजमेंट (नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया पार्ट-४ फायर प्रोटेक्शन १९९७ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा) संदर्भात नियमानुसार व्यवस्था करणे आवश्यक राहील.

१७. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांना राज्य शासनाचे सर्व नियम कायदे व आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा या संपूर्णत व्यवस्थापनांतर्फे स्वयंनिधीतुन चालविल्या जातील व शासनाकडुन त्यांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

१९. शासनातर्फे दिले जाणारे ना हरकत प्रमाणपत्र इ.१२ वी पर्यंत लागू राहील.

२०. शासनाने मागितलेली कोणतीही माहिती सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई मंडळाशी संलग्नित शाळांनी देणे बंधनकारक राहील. तसेच या शाळांची शैक्षणिक / लेखाविषयक तपासणी करण्याचे अधिकारदेखील राज्य शासनास राहतील.

२१. शासनाच्या नियमांची अटी, शर्तीची पूर्तता करणार नाही अशा शाळांची ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे
पुणे जिल्हा परिषद, पुणे

MRS. MADHUBALA AMIT BARELIKAR
PRINCIPAL

JSPM'S PRODIGY PUBLIC SCHOOL, WAGHOLI
CBSE AFFILIATION NO. 1130183

PRINCIPAL
Prodigy Public School